# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६२९/२०१७/२२

**(नोदंणी क्रमांक २०१७०५००१७)**

| | |
|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- ०२.०५.२०१७ |
| निकाल | दिनांक :- २७.०६.२०१७ |

श्री. अंबादास विश्वनाथ मेटे — तक्रारदार
प्लॉट नं. बी-१, एमआयडीसी,
इंडस्ट्रियल एरिया, वाळुज
औरंगाबाद ४३११३६.
(नविन वीजजोडणी)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. लक्ष्मण मु. काकडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु. काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. अंबादास विश्वनाथ मेटे, प्लॉट नं. बी-१, एमआयडीसी, इंडस्ट्रियल एरिया, वाळुज, औरंगाबाद यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक ०२.०५.२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.**

अर्जदाराने वाळुज, एमआयडीसी मध्ये बी-१ हा भुखंड **A.R.C.I.L.** यांच्या मार्फत लिलावामध्ये विकत घेतला. या भुखंडावरती पुर्वी श्री. राजेंद्र पेटा यांची विद्युत मंडळाकडे थकबाकी होती. नंतर इ.स. २०१३ मध्ये अर्जदारने मे. जीटीएल कंपनीला वारंवार पाठपूरावा करुन पुर्वीची थकबाकी क्लीअर करुन आम्हाला वीज जोडुन द्या अशी मागणी केली, शेवटी मे. जीटीएल कॉन्ट्रक्टर मार्फत वीज कनेक्शन दिले. परंतु नंतर नोव्हेंबर २०१६ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांच्या भरारी पथकाने मीटर चेक केले असता ते फॉल्टी आहे असे म्हणुन रुपये ३२८९७७/- इतका दंड आकारला. तो आम्ही एक जबाबदार नागरिक म्हणुन भरला व पुन्हा महामंडळाकडे नविन वीज जोडणीसाठी अर्ज केला. परंतु पुर्वी या कंपनीचे मालक पेंटा यांची जुनी थकबाकी आमच्यावर लादण्यात येत आहे. एवढी थकबाकी आम्ही भरु शकत नाही. जुन्या मालकावर दंडात्मक कारवाई करुन आम्हाला नवीन वीज जोडण्यात मदत करावी व आमच्या होणाऱ्या नुकसानीची काळजी करुन आम्हाला सहकार्य करावे अशी विनंती ग्राहक मंचास केली आहे.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.</u>**

कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, वाळुज उपविभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक १६.०५.२०१७ नुसार असे सादर केले आहे की, अर्जदार श्री. अंबादास विश्वनाथ मेटे यांच्या मालकीचा प्लॉट नं. बी-१, एमआयडीसी, इंडस्ट्रियल एरिया, वाळुज येथे आहे. तत्पुर्वी त्या जागेवर मे. राजेंद्र पेंटा या नावाने उच्चदाब जोडणी होती. सदर ठिकाणी अर्जदाराने लघुदाब जोडणीची मागणी केलेली आहे. त्यानुसार तपासणी केली असता त्या जागेवर पुर्वीची थकबाकी रुपये १६०००००/- पेक्षा जास्त आढळुन आलेली आहे. सदर थकबाकी भरण्यास अर्जदाराने नकार दिलेला आहे. त्यामुळे महावितरणच्या नियमानुसार सदर जागी नविन विद्युत जोडणी देता येत नाही.

दरम्यान भरारी पथक , औरंगाबाद यांनी सदरील जागेवर छापा टाकला असता तेथे अनाधिकृत रित्या विद्युत पूरवठा घेऊन वीज वापरत असल्याचे आढळुन आल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली व त्यांना रुपये ३२८९७७/- इतके वीज चोरीचे देयक दिले होते. सदर वीज चोरीचे देयक त्यांनी पावती क्रमांक १२४२०७३ नुसार रक्कम रुपये ३२८९७७/- दिनांक १८.११.२०१६ रोजी भरणा केलेला आहे.

त्याच प्रमाणे अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचे दिनांक २९.०५.२०१७ च्या पत्रानुसार वीज वापराच्या थकबाकीयुक्त जागेवर वीज पूरवठा प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यास महावितरणचे वाणिज्य परिपत्रक क्र. ५३, ९७ व २६० नुसार कार्यवाही करण्यात येते. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने ग्राहकास थकीत रकमेची देय थकबाकी भरण्याविषयी कळविण्यात आले होते, अशी थकबाकी ग्राहकास मंजूर नाही.

४/-

## <u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष</u>

१) अर्जदाराने एमआयडीसी, वाळुज, येथील प्लॉट नं. बी-१ हा भुखंड **A.R.C.I.L.** यांच्या मार्फत लिलावामध्ये विकत घेतला आहे. या भुखंडावरती मे. राजेंद्र पेंटा यांच्याकडे विद्युत मंडळाची थकबाकी होती.

२) जे भुखंड कोर्ट लिलाव / **D.R.T.** किंवा अन्य कायदेशीर प्रक्रियेद्वारे विकत घेतले जातात, अशा भुखंडावर असलेल्या पुर्वीच्या ग्राहकांची थकबाकी वसुल करण्यासाठी महावितरण कंपनीने नियमावली तयार केलेली आहे. सदर नियमावली वाणिज्य परिपत्रक क्रमांक ५३, ९७ व १६० नुसार करण्यात येत आहे.

३) वरील परिपत्रकानुसार ग्राहकाने नविन विद्युत जोडणी घेण्यापुर्वी महावितरण कंपनीला पुर्वीच्या ग्राहकाच्या थकबाकीची (सहा महिन्यांची) भरणे आवश्यक आहे व उर्वरित थकबाकी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर भरण्यासंबंधी स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र लिहून देणे आवश्यक आहे. सदरचा संदर्भ, वाणिज्य परिपत्रक क्रमांक ९७ मध्ये देण्यात आलेला आहे. अर्जदाराने वाणिज्य परिपत्रक क्रमांक ९७ नुसार जुन्या ग्राहकाची थकबाकी टेम्पररी डिसकनेक्शन पुर्वी सहा महिने असलेली थकबाकी भरावी व उरलेल्या थकबाकी संबंधी प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे. त्यानंतर अर्जदारास महावितरणने नविन वीज जोडणी करुन द्यावी.

वरील प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांनी सूनावणी दरम्यान सादर केलेले म्हणणे, त्याचप्रमाणे ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने काढलेले निष्कर्ष याचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदाराने जुन्या ग्राहकाची **Temporary Disconnection** पुर्वीची सहा महिन्यांची थकबाकी भरावी व उर्वरित थकबाकी साठी महावितरणचे वाणिज्य परिपत्रक क्रमांक ९७ प्रमाणे प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे.

२) वरील (१) प्रमाणे अर्जदाराने कार्यवाही केल्यानंतर महावितरणने अर्जदारास नविन वीज जोडणी करुन द्यावी.

३) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | लक्ष्मण मु. काकडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |